## प्रेस नोट ता. ०३/०८/२०१९

# घरफोडी चोरी व दुचाकी वाहने चोरी करणारे चोरटयांना हडपसर पोलीसांकडुन अटक

दिनांक ३१/०७/२०१९ रोजी हडपसर पोलीस स्टेशन हददीत तपास पथकातील अधिकारी व कर्मचारी गुन्हे प्रतिबंधक पेट्रोलींग करीत असताना पो.ना. ६४८९ विनोद शिवले, पो. शि. ८६९२ अकबर शेख यांना गोपनीय बातमीदाराकडुन गोपनीय बातमी मिळाली की, म्हाडा कॉलनी, हडपसर पुणे येथे चोरीच्या उददेशाने दोन इसम टेहळणी करीत अंधारामध्ये एका दुचाकीवर थांबलेले आहेत. अशी बातमी मिळाल्याने लागलीच तपास पथकातील अधिकारी व कर्मचारी हे सदर ठिकाणी गेले असता त्या ठिकाणी अनोळखी दोन इसमांना हटकताच ते पळुन जाण्याचा प्रयत्न करीत होते. तेव्हा त्यांचा पाठलाग करुन त्यांना पकडले असता त्यांनी त्यांची नावे १) जितसिंग ऊर्फ जितु राजपालसिंग टाक, वय २३ वर्षे, रा. बिराजदार नगर, गल्ली नं. ५, वैदवाडी, हडपसर, पुणे व २) हुकुमसिंग रामसिंग कल्याणी, वय २८ वर्षे, रा. कोठारी व्हिल्स शोरुमच्या जवळ, रामटेकडी, हडपसर, पुणे असे असल्याचे सांगितले. तसेच त्यांचेकडील गाडीच्या पुढील व मागील बाजुस नंबर नसल्याचे निदर्शनास आले. तसेच त्यांचे पैकी एका जवळ लोखंडी कटावणी मिळुन आली. त्यानंतर त्यांना हडपसर पोलीस स्टेशन येथे आणुन अधिक तपास केला असता त्यांनी यापुर्वी म्हाडा कॉलनी येथे घरफोडी चोरी केल्याचे कबुल केल्याने सदर बाबत हडपसर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. ५९९/२०१९ भादविक ४५४ ,४५७, ३८० हा गुन्हा केला असल्याचे निष्पन्न झाले. तेंव्हा वरील नमूद आरोपीतांना दाखल गुन्हयात अटक करुन त्यांचेकडे कशोसिने तपास करुन त्यांचेकडुन हडपसर पोलीस स्टेशनकडील ०२ गुन्हे घरफोडी चोरीचे व ०३ वाहन चोरीचे गुन्हे, पिंपरी पोलीस स्टेशनकडील ०१ वाहन चोरीचा गुन्हा असे एकुण ०६ गुन्हे उघडकीस आणण्यात आले आहे.

वर नमुद आरोपीतांनी याचे ताब्यातुन घरफोडी चोरी केलेले २० ग्रॅम सोन्याचे गंठण, एक गॅस सिलेंडर व चोरी केलेल्या ०४ मोटार सायकली असा सर्व मिळुन २,१२,२००/- रुपयांचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच यापुर्वी आरोपी नामे जितसिंग ऊर्फ जितु राजपालसिंग टाक हा घरफोडीच्या गुन्हयात पाहिजे आरोपी होता.

सदरची कामगिरी मा. सुनिल फुलारी, अप्पर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग पुणे व मा. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ५ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक रघुनाथ जाधव, पोलीस निरीक्षक शिवाजी शिंदे, पोलीस निरीक्षक हमराज कुंभार, यांचे सुचनानुसार सहा. पोलीस निरीक्षक संजय चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक तुषार पाचपुते,पो.हवा.८२३ पठाण, पो.हवा. ५५६२ नवले, पो.हवा. ३८६८ औचरे, पो.हवा. ८७४ सोनवणे, पो.ना. २८०० प्रताप गायकवाड, पो.ना. ६४८९ विनोद शिवले, पो.ना. ६८७० सैदोबा भोजराव, पो.ना. ५८५३ गणेश दळवी, पो.शि. १०१५ अनिल कुसाळकर, पो. शि. ८६९२ अकबर शेख, पो. शि. ७५१२ गोविंद चिवळे, पो.शि. ७६८४ शंशिकांत नाळे, पो.शि. ८३७६ अमित कांबळे, पो.शि. ८७६१ ज्ञानेश्वर चित्ते, पो.शि. पवार यांनी केली आहे.